रोजगार हमी योजने अंतर्गत वनीकरणासाठी कर्मचारी/अधिकारी यांच्या अस्थायी पदांना सन २०१७-१८ मध्ये मुदतवाढ मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- एफडीएम-२०१७/प्र.क्र.४४/फ-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :-१८ जानेवारी, २०१८

वाचावे:-

१) शासन निर्णय क्र.ईजीएस-१०९५/५२७/प्र.क्र.१००/फ-२ दि. १६.१०.१९९५
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग,क्रमांक-एफडीएम-२०१७/प्र.क्र.४४/फ-२, दि.२३.१०.२०१७
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि-२०१७/प्र.क्र ०८/१६/आ.पु.क. , दि.०८.०१.२०१८
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/रोहयो/चाबाप्र/प्र.क्र.२९/१६-१७/२१९४, दि.२३.०२.२०१७

शासन निर्णय:-

वन विभागामध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामीणांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी, वन विभागातील कामे (उदा. वनीकरण, जलसंधारण व वनतळयांची कामे) घेण्यात येतात. ही कामे करुन घेण्यासाठी सोबत दर्शविलेल्या विवरणपत्रातील कर्मचारी वन विभागांतर्गत कार्यरत आहेत. सन २०१७-१८ मध्ये संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि. २३.१०.२०१७ अन्वये एकूण ९३८ पदांना दि. ०१.१०.२०१७ ते ३१.१२.२०१७ पर्यन्त मुदतवाढ देण्यात आली होती.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी संदर्भ क्र. ४ येथिल दि.२३.०२.२०१७ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेली ९३८ पदे वन विभागाच्या मंजूर आकृतीबंधामध्ये समाविष्ट असल्याने या ९३८ पदांना दि.०१.०१.२०१८ ते २८.०२.२०१८ पर्यन्त मुदतवाढ देण्यात येत आहे.

या पदांवर होणारा खर्च प्रधान शीर्ष-२४०६-वनीकरण व वन्यजीवन १०१ वनसंधारण, विकास (०२)(०२) कृत्रिम पुनर्निमिती (२४०६ ०१२२)या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच शासन निर्णय दि. १६.१०.१९९५ अन्वये विहीत केलेल्या पध्दतीनुसार रोजगार हमी योजनेंतर्गत वनीकरणाच्या आस्थापना विषयक खर्चाबाबत कार्यवाही करण्यात यावी. या कालावधीमध्ये मंजूर पदांचा आढावा घेऊन, सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

प्रस्तूत शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय, क्रमांक-पदनि २०१६/प्र.क्र.०८/१६/ आ.पु.क., दि.०८.०१.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११८१३३७०७९७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.01.18 13:43:17 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

सोबत:- विवरणपत्र

<u>प्रतिलिपी</u> :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) व (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्या. नागपूर
४) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
५) जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई शहर / मुंबई उपनगर वगळुन)
६) सर्व मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक)
७) प्रादेशिक व्यवस्थापक (सर्व) महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्या. नागपूर
८) विभागीय व्यवस्थापक (सर्व) महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्या. नागपूर
९) सर्व उपवनसंरक्षक, (प्रादेशिक)
१०) सर्व विभागीय वन अधिकारी /उप विभागीय वन अधिकारी, (प्रादेशिक)
११) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
१३) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती / ठाणे /औरंगाबाद /पुणे /कोल्हापूर /नाशिक /नागपूर /धुळे /चंद्रपूर /गडचिरोली /यवतमाळ /नागपूर.
१४) वित्त विभाग, व्यय १०/अर्थसं-१९ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१५) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१६) कार्यासन अधिकारी (ब-१), वन विभागीय सर्व कार्यासने महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१७) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, म.व व.वि. मंत्रालय,मुंबई-३२

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.- एफडीएम-२०१७/प्र.क्र.४४/ फ-२,दि. १८ .०१.२०१८ चे सहपत्र.

अ.क्र.	वनवृत्त	सवंर्ग निहाय पदे								
		विभागीय वन अधिकारी	सहाय्यक वनसंरक्षक	वनपरिक्षेत्र अधिकारी	वनपाल	वनरक्षक	कार्यालय अधिक्षक	लेखापाल	लिपीक	एकूण
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११
१	अमरावती	०	२	८	१०	४०	०	०	०	६०
२	ठाणे	०	१	२	१०	९	०	०	०	२२
३	औरंगाबाद	०	४	११	२९	७९	०	३	३	१२९
४	पुणे	०	१	५	१५	२८	०	३	१	५३
५	कोल्हापूर	०	१	७	११	१४	०	२	०	३५
६	नाशिक	०	५	१७	४०	९३	०	०	४	१५९
७	नागपूर	०	४	६	२५	५७	०	२	३	९७
८	धुळे	०	३	८	२२	४५	०	०	१	७९
९	चंद्रपूर	०	१	३	१८	३७	०	०	१०	६९
१०	गडचिरोली	०	१	५	१३	२९	१	०	०	४९
११	यवतमाळ	०	२	९	२९	५३	०	०	०	९३
१२	प्रमुवसं, नागपूर कार्यालय	२	०	१	१	०	०	०	०	४
१३	अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) पुर्व भाग, नागपूर	०	२	१०	२	२५	०	०	०	३९
१४	अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई	०	०	०	१५	३२	०	०	३	५०
	एकूण	२	२७	९२	२४०	५४१	१	१०	२५	९३८

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d2444 8c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.01.18 13:43:36 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव
महसूल व वन विभाग